# फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले

तीत ४५ ते ५५ वर्षे या वयोगटातील १२ ते १५ टक्के पुरुष तंबाखूचे अतिसेवन करीत असल्याचे आढळून आले. तसेच तरुण पिढीतील १५ टक्क्यांपेक्षा अधिक पुरुष व महिलांना फुफ्फुस आणि तोंडाचा कॅन्सर होण्याचा धोका असल्याचे आढळून आल्याचे त्या म्हणाल्या. या पार्श्वभूमीवर कंपनीने ही जागृती मोहीम हाती घेतल्याचे माहिती त्यांनी यावेळी दिली.

'इंड्स हेल्थ प्लस' संस्थेतर्फे जागृती

# तोंड, घसा व फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले

**पणजी (न. प्र.)**

गोव्यात धुम्रपान व तंबाखूचे सेवन करणाऱ्या लोकांची संख्या मोठी असून या कारणामुळे राज्यात तोंड, घसा व फुफ्फुसांच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले असल्याचे आढळून आले आहे. यासाठी 'इंड्स हेल्थ प्लस'ने काल गोव्यात तंबाखूविरोधी जागृती घडवून आणल्याचे कंपनीच्या मार्केटिंग सहाय्यक व्यवस्थापिका त्रिशा रॉय यांनी काल येथे पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. तंबाखूविरोधी दिनाच्या पूर्वसंध्येला काल आयनॉक्स आवारात बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

कंपनीने काल दिवसभर आयनॉक्स थिएटरमध्ये चित्रपट बघायला येणाऱ्या प्रेक्षकांना तंबाखूपासून दूर राहण्याचा सल्ला दिला. गोव्यातील १८ हजार लोकांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी कंपनीने केली होती. ...पान ११ वर ▶